**नियमित दिवाणी दावा क्र.९३/२०२४**
**बाळासो पाटील विरुध्द भाऊसो पाटील.**

**MHSN090006592024**

<u>**निशाणी क्र. ५ खालील आदेश**</u>

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त ताकीद मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, त्यांनी सदरचा दावा जाहिर ठरावाकरीता व निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकत गट क्र. २९१ या मिळकतीच्या पश्चिमेकडील बाजूस वादींच्या मिळकतीतून उत्तरेकडील येळावी रस्त्यास जाणारा १२ x ७० फूट दक्षिण–उत्तर रस्ता प्रतिवादींचे मिळकतीतून आहे. सदर रस्ता दाव्यासोबत दिलेल्या हातनकाशात A,B,C,D अक्षराने दाखविलेला आहे. गट क्र. २९१ ही मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत होती. वादीचे वडील रावसो पाटील व प्रतिवादींचे वडील यशवंत व इतर असे पाच सख्खे भाऊ होते. त्यांच्या वडीलांचे नाव आनंदा पाटील असे होते. आनंदा पाटील मयत झाल्यानंतर गट नं. २९१, २९५ या मिळकतीमध्ये सन १९६० च्या आसपास त्या पाचही भावामध्ये आपसात तडजोडीने तोंडी वाटप झाले होते. त्याप्रमाणे गट क्र. २९५ ही मिळकत रामचंद्र पाटील व गट क्र. २९१ ही मिळकत यशवंत, रावसो व मारुती यांच्या हिश्यास आली. गट क्र. २९१ च्या दक्षिणेकडील पूर्व–पश्चिम पट्टी यशवंत व रावसो यांच्या वाटपास आली. त्यापैकी दक्षिणेची पूर्व–पश्चिम पट्टी १ एकर ७ गुंठे हे क्षेत्र रावसो यांच्या वाटयास आले व

त्यांच्या उत्तरेकडील पूर्व–पश्चिम १ एकर ६ गुंठे हे क्षेत्र यशवंत यांच्या वाटपास आले. या दोन्ही पूर्व–पश्चिम पट्ट्यांच्या पूर्वेकडील दक्षिण–उत्तर पट्टी गणपती यांचे वाटपास आली व गणपतीच्या पूर्वेकडील दक्षिण–उत्तर पट्टी मारुती यांना वाटपाने मिळाली. गणपती यांनी त्यांचा गट क्र. २९१ मधील हिस्सा सन १९६० च्या आसपास विक्री केलेला आहे. वाटपाबाबत वादी व प्रतिवादींमध्ये आजपावेतो कोणत्याही तक्रारी नव्हत्या व नाहीत. रावसो पाटील यांच्या मृत्यूनंतर त्यांचा हिस्सा वादी क्र. १ व २ यांना मिळाला असुन त्यामध्ये त्यांची आजही वहिवाट आहे. तेथे त्यांची शेती व घरे आहेत. वादी क्र.२ च्या क्षेत्राच्या उत्तरेकडील पूर्व–पश्चिम पट्टी यशवंत यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. १ व २ यांची असुन त्यामध्ये त्यांची वहिवाट होती व त्या क्षेत्राच्या पश्चिमेकडील १२ X ७० फूट क्षेत्र प्रतिवादींनी स्वतःच्या व वादींच्या रस्त्याकरीता सोडलेले आहे. प्रतिवादींच्या क्षेत्राच्या उत्तर बाजूने पूर्व–पश्चिम असा जुना येळावी रस्ता आहे. वादी हे त्यांच्या क्षेत्रातून बाहेर पडून प्रतिवादींच्या पश्चिमेकडील दक्षिण–उत्तर रस्त्यातून उत्तरेस असलेल्या येळावी रस्त्याचा पुर्वीपासून वापर करतात. त्या रस्त्याशिवाय वादींना पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. गट क्र. २९१ मध्ये ज्यावेळी यशवंत, मारुती, गणपती व रामचंद्र यांच्यामध्ये तोंडी वाटप झाले तेव्हापासून सदर रस्त्याचा वापर वादी व वादीचे पूर्व हक्कदार करत आलेले आहेत. त्याबाबत त्यांच्यामध्ये कोणतेही वाद नसुन प्रतिवादींनीही वादींना तसे संमतीपत्र लिहुन दिलेले होते व आहे. तसेच सदर रस्ता वादी हे पुर्वीपासून वापरत असल्याने तो वादींना सुखाधिकाराने मिळालेला आहे. वादींचा त्या रस्त्यावर प्रथागत हक्क आहे. वादींना पर्यायी रस्ता नसल्याने आवश्यक सुखाधिकाराने वादी व वादींचे पुर्वज सदर रस्त्याचा वापर करत आलेले आहेत.

३. वादी पूढे असे कथन करतात की, पूढे प्रतिवादींनी अनाधिकाराने

सदर रस्त्याबाबत हरकती निर्माण केल्या व वादींना जाण्या–येण्यास अडथळा निर्माण केला म्हणून वादींनी मामलेतदार कोर्ट कायदा कलम ५(२) अन्वये रस्त्यातील अडथळा दूर करुन मिळावा म्हणून तहसिलदार तासगांव यांचेकडे अर्ज दाखल केला होता. परंतू, तो तांत्रीक कारणावरुन तहसिलदार यांनी नामंजूर केलेला आहे. सदर रस्त्याबाबतचे हक्क शाबीत करुन घेण्यासाठी वादींना दिवाणी कोर्टात दाद मागणे आवश्यक असल्याने वादींनी सदरचा दावा दाखल केला आहे. वादींचा अर्ज तहसिलदारांनी नामंजूर केल्यानंतर प्रतिवादींनी रस्ता बंद करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यामुळे वादींनी सदरचा दावा दाखल करुन दाव्याचा अंतीम निकाल होईपावेतो प्रतिवादींनी स्वतः अगर त्रयस्थ इसमांमार्फत हातनकाशामधील A,B,C,D या अक्षराने दर्शविलेल्या वादींच्या रस्त्याच्या हक्कास कोणताही हरकत अडथळा करु नये अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादींनी सदर अर्जावर निशाणी क्र. १५ अन्वये म्हणणे दाखल करुन वादींची संपूर्ण कथने नाकारली आहेत. प्रतिवादी पूढे असे कथन करतात की, प्रस्तुत ताकिदीचा अर्ज हा काल्पनिक स्वरुपाचा असुन रावसो पाटील यांच्या मृत्यूनंतर वादी क्र. १ व २ हे वाटपाने वहिवाटीत आहेत हे वादींचे कथन दिशाभूल करणारे आहे. वादी क्र. १ ने तहसिलदार तासगांव यांचे न्यायालयात प्रतिवादींचे विरुध्द अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये वादी क्र. १ व २ यांच्यामध्ये अदयाप वाटप झालेले नसल्याचे वादीचे कथन आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी कधीही त्यांच्या क्षेत्राच्या पश्चिम बाजूने १२ X ७० फूट लांबीचे क्षेत्र रस्त्याकरीता सोडलेले नव्हते व नाही. वादींना प्रतिवादींच्या मिळकतीत कोणताही तथाकथीत रस्ता नव्हता व नाही. प्रतिवादींच्या मिळकतीच्या उत्तरेस जुना येळावी रस्ता नाही. वादीची ही सर्व कथने दिशाभूल करणारी आहेत. पूर्वीपासून गट क्र. २९१ च्या

पूर्व–उत्तर बाजूने वादी त्यांच्या मिळकतीकडे ये–जा करीत असतात व त्याच रस्त्याचा वापर करीत असतात. सदर बाब त्यांनी मुद्दाम लपवुन ठेवलेली आहे. प्रतिवादींनी कोणत्याही मिळकतीमधून रस्त्याबाबतचे कोणतेही सुविधाधिकार वादी अथवा त्यांच्या पूर्व हक्कदारांना दिलेले नव्हते व नाही. वादींचा सदर मिळकतीशी दुरान्वयेही कोणताही संबंध नाही. वादीने दाखल केलेले संमतीपत्र धादांत खोटे आहे. ते प्रतिवादींनी कधीही लिहून दिलेले नाही. तहसिलदार तासगांव यांनी वादींचा अर्ज तांत्रीक कारणावरुन नामंजूर केलेला नसुन तेथे वहिवाटीचा रस्ता दिसुन येत नसल्याने तो नामंजूर केलेला आहे. मामलेतदार कोर्टासमोरील अर्जात वादींनी सदर रस्ता प्रतिवादींनी बंद करुन टाकला आहे अशी कथने केली आहेत. यावरुन वादीचा खोटेपणा उघड होतो. कोणत्याही वाटपाने वादींना तथाकथील रस्ता मिळालेला नाही व प्रतिवादींनी रस्त्याबाबतचे कोणतेही करारपत्र वादींना अगर त्यांच्या पूर्वजांना करुन दिलेले नाही. वादींच्या म्हणण्याप्रमाणे कोणताही रस्ता अस्तीत्वात नव्हता व नाही. वादींचे घर निमणी गावामध्ये आहे व त्यांच्या गट क्र. २९१ च्या क्षेत्रात जाण्याकरीता गट क्र. २९१ च्या पूर्व बाजूने मार्ग असुन पूर्वापार वादी त्याच रस्त्याचा वापर करीत आलेले आहेत. प्रथम दर्शनी केस वादींच्या बाजूने नाही. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादीतर्फे विद्वान वकील श्री. व्ही.व्ही. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी युक्तिवादादरम्यान असे सांगितले की, निशाणी क्र. ३० सोबत नकाशा दिलेला असुन त्यामध्ये गट क्र. २९१ च्या उत्तर बाजूला रस्ता आहे व त्याचा कच्चा हातनकाशा निशाणी क्र. ३ सोबत दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी हे चुलत भाऊ आहेत. त्यांच्यामध्ये वाटपाबाबत वाद नाही. निशाणी क्र. ३ सोबत दाखल

असलेल्या संमती पत्रान्वये गट क्र. २९१ मध्ये जाण्या–येण्यासाठी १२ X ७० फूट रस्ता सोडलेला आहे. वादी त्याच रस्त्याने वहिवाट करतात. वादींचे त्यांच्या शेत मिळकतीमध्ये घरे व गोठा आहे. मा. तहसिलदार यांनी रस्ता केसमध्ये योग्य ती प्रक्रिया व पध्दत अवलंबलेली नाही. प्रतिवादींनी तहसिलदारासमोरील त्यांच्या म्हणण्यामध्ये तो रस्ता असल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादींनी संमतीपत्रान्वये वादींना रसत्याचा हक्क दिलेला आहे. प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये त्यांनी केवळ वादीची कथने नाकारलेली आहेत. वादींना पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याचे प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये नमुद केले आहे परंतू, त्याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. वादीने दाखल केलेल्या छायाचित्रामध्ये तो रस्ता दर्शविला आहे. तसेच ज्या साक्षीदाराचे प्रतिज्ञापत्र दिले आहे तो दावा मिळकतीचा सहहिस्सेदार आहे. त्यामुळे प्रतिवादींनी संमतीपत्रान्वये दिलेला रस्ता अस्तीत्वात असुन त्याच रस्त्याने वादी आजही वहिवाट करीत असल्याने सदर रस्त्याच्या वापरास प्रतिवादींनी स्वतः अगर त्रयसत इसमांमार्फत् वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करुन नये असा मनाई हुकूम वादींच्या लाभात देणे आवश्यक आहे. अशा प्रकारे मनाई दिल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही.

६. प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. ए.डी. वर्धन यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी युक्तिवादादरम्यान असे सांगितले की, तहसिलदारांसमोरील अर्जास वादींनी प्रतिज्ञापत्र दिलेले नव्हते. रस्त्यामध्ये कधी अडथळा केला याची तारीख वादीने नमुद केलेली नसल्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर झालेला आहे. वादी व प्रतिवादी अगर त्यांच्या पूर्वजामध्ये कधी वाटप झाले याची कोणतीही तारीख किंवा कागदपत्रे वादीने दिलेली नाही. तहसिलदार यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये वादीने, वादी क्र. १ व २ यांच्यात अदयाप वाटप झालेले नाही, ते एकत्र आहेत असे कथन केले

आहे. परंतू, सदर अर्जामध्ये त्यांच्यात वाटप झालेले आहे असे कथन केले आहे. तहसिलदारांकडील अर्जात् रस्त्याचे वर्णन १२ X ९० असे दिलेले आहे तर सदर दाव्यामध्ये रस्त्याचे वर्णन १२ X ७० असे दिलेले आहे. निशाणी क्र. ३ सोबत दाखल असलेल्या संमती पत्रावर प्रतिवादींच्या सहया नाहीत. त्यामुळे जोपर्यंत करार स्विकारलेला नाही तोपर्यंत तो करार कायदेशीर होत नाही. सन १९६० सालापासून रस्ता असल्यास तो नकाशात अगर उता-यात यायला पाहिजे होता. संमतीपत्रावर प्रतिवादींची सही नसल्याने ते याकामी वाचता येणार नाही. तहसिलदारांच्या निकालानंतर ८ महिन्यांनी हा दावा दाखल केला आहे. म्हणजेच यापुर्वी वादी त्यांची वहिवाट करीत होते. याचा अर्थ त्यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. तहलिसदारांसमोरील अर्जात वादींनी रस्त्यात खड्डे खोदून रस्ता बंद केल्याचे कथन केले आहे. तसेच या दाव्यामध्ये तहसिलदारांच्या निकालानंतर रस्ता बंद केला असे दाव्यास कारण नमुद आहे. सन १९६० मध्ये झालेल्या वाटपाबाबत सन १९९९ मध्ये संमती तयार करण्याची गरज का भासली याबाबत वादींनी कोणतेही कथन केलेले नाही. तसेच त्या संमतीपत्रामध्ये १९६० च्या वापटपाप्रमाणे रस्ता असल्याचे नमुद नाही. वादींना केवळ सोयीकरीता प्रतिवादींच्या मिळकतीतून रस्ता हवा आहे. त्यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असताना, अशा प्रकारे प्रतिवादींच्या शेतातून रस्ता मागता येणार नाही. वादीने अभिलेखावर दाखल केलेले घराचे उतारे या घर मिळकती शेत मिळकतीतील नाहीत. दावा मिळकत येळावी रस्त्यालगत आहे तर घरे ही निमणी ते नागाव रस्त्यालगत आहेत. प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये जागा सोडली आहे असे जरी म्हटंले असले तरी ती जागा त्यांनी त्यांच्या सोयीकरीता सोडलेली आहे. तो सुविधाधिकार होत नाही. यास्तव त्यांनी वादीचा अर्ज हा काल्पनीक असल्याने तो नामंजूर करावा अशी

विनंती केली आहे.

७. उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज निकाली काढतेवेळी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींना प्रथमदर्शनी केस असल्याबाबत वादी शाबीत करतात काय ? | होकारार्थी |
| २ | न्यायाचा तराजू वादींच्या बाजुने असल्याचे वादी शाबीत करतात का ? | होकारार्थी |
| ३ | तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान हानी होईल काय ? | होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

८. अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी वादीने अभिलेखावर मुळ दाव्यासोबत कच्चा हातनकाशा, गट क्र. २९१ चा ७/१२ उतारा, तहसिलदार तासगांव यांचेकडील अर्जाचे निकालपत्र, मालमत्ता क्र. ४९७/१ व ४९७/२ चे नमुना ८ चे कर आकारणी उतारे, रस्त्याबाबतचे संमतीपत्र, ग्रामपंचायत कर पावत्या, वीज बील, वादातीत रस्त्याचे छायाचित्र तसेच मौजे निमणी गावचा गावनकाशा ही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. तसेच वादीने पोपट मारुती पाटील यांचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. याउलट प्रतिवादींनी

तहसिलदार तासगांव यांचेसमोरील अर्जाच्या निकालाची प्रत दाखल केली आहे.

९. वादींनी प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत केल्यास अगर मनाईचा आदेश वादीच्या लाभात न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे अशी परिस्थिती असल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ नुसार न्यायालय तुर्तातुर्त मनाईचे आदेश देवू शकते असे कायदयाचे तत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रथमदर्शनी प्रकरण वादींच्या बाजुने आहे किंवा कसे हे तपासणे उचीत ठरते. याक्षणी न्यायालयास गुणदोषावर निकाल दयायचा नसून फक्त वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी दाव्याचा कल दिसून येतो का हे पाहणे आवश्यक आहे. वरील कायदेशीर तत्व विचारात घेवून अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

१०. यामितीस न्यायालयाला गुणदोषावर न्यायनिर्णय पारीत करावयाचा नसुन केवळ प्रथमदर्शनी पुराव्याचे विवेचन करुन वादातीत रस्ता अस्तीत्वात आहे काय, असल्यास वादी पूर्वीपासून त्याचा वापर करतात काय व प्रतिवादींनी त्यामध्ये अडथळा निर्माण केला आहे काय, तसेच वादातील रस्त्याव्यतीरिक्त पर्यायी रस्ता वादींना उपलब्ध आहे काय ? या प्रश्नांची उत्तरे शोधून त्याबाबत तात्पुरता निर्णय पारीत करावयाचा आहे. प्रतिवादीतर्फे वकीलांनी त्यांच्या युक्तिवादादरम्यान वादरस्त्याच्या जागेवर रस्ता नसुन तेथे प्रतिवादींनी त्यांच्या वापरासाठी व सोयीसाठी जागा सोडलेली आहे असे कथन केले आहे. तसेच त्यांनी मा. तहसिलदार, तासगांव यांचेकडे रस्ता केसमध्ये दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये देखील त्यांनी स्वतःच्या वापरासाठी जागा सोडली आहे असे कथन केलेले आहे. वादींनी अभिलेखावर दाखल केलेले संमतीपत्र पाहता प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादींच्या वडीलांना गट नं. २९१ मध्ये जाण्या–येण्यासाठी १२ x ७० रस्ता

सोडलेला आहे असे त्यामध्ये नमुद आहे. प्रतिवादींच्या वकीलांनी त्यावर प्रतिवादींच्या सहया नाहीत असा आक्षेप नोंदविला, परंतू ते संमतीपत्र खरे आहे की खोटे हे पुराव्याअंती ठरणार आहे. प्रथमदर्शनी सदर संमतीपत्रावरुन वादींनी प्रतिवादींना वापरासाठी रस्ता दिलेला आहे असे दिसुन येते. अभिलेखावरील छायाचित्रामध्ये देखील रस्ता आढळून येतो. वादींनी त्यांचे सहहिस्सेदार पोपट मारुती पाटील यांचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यांनीदेखील वादरस्ता अस्तीत्वात असुन तो वादी व प्रतिवादी यांच्या पूर्वंजामध्ये झालेल्या वाटपाचा हिस्सा होता व तो सन १९६०–६१ पासून आजपावेतो कायमस्वरुपी चालू होता. तसेच प्रतिवादींनी सदर रस्त्याबाबत वादींना संमतीपत्र देखील लिहून दिलेले आहे असे कथन केले आहे. म्हणजेच प्रथमदर्शनी वादरस्ता हा अस्तित्वात आहे ही बाब सिध्द होते.

**११.** वादी हे सदर रस्त्याचा वापर करत होते किंवा नाही याबाबत अभिलेखावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादींचे कथन असे आहे की, वादरस्ता हाच वादींना वापराकरीता एकमेव रस्ता आहे. याव्यतीरिक्त अन्य रस्ता नाही ही बाब सहहिस्सेदारांनी देखील त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केली आहे. प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये वादींना पर्यायी रस्ता असल्याचे कथन केले आहे. परंतू, तो रस्ता असल्याचे कोणतेही छायाचित्रे अगर पर्यायी रस्ता आहे हे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेले नाही. वादरस्त्याबाबत मा. तहसिलदार यांच्यासमोर झालेला अर्ज केवळ तांत्रीक कारणावरुन नामंजूर झाला आहे असे दिसते. म्हणजेच वादरस्त्याचा वापर वादी हे पूर्वीपासून करत आलेले आहेत ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते. प्रतिवादीतर्फे वकीलांनी युक्तिवादादरम्यान वादींनी तहसिलदारांसमोरील अर्जास लावलेले कारण व दाव्यास

लावलेले कारण हे वेगवेगळे असल्याचे कथन केले आहे. दाव्यामध्ये वादीने असे कारण नमुद केले आहे की, तहसिलदारांकडे रस्ता केसचा निकाल लागल्यानंतर प्रतिवादींनी वादींचा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न केला. परंतू, तहसिलदारांसमोरील अर्जामध्ये वादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी सदर रस्त्यावर खड्डे काढून नांगरुन तो रस्ता बंद केला आहे. वादीने दाव्यात दाखल केलेल्या रस्त्याच्या छायाचित्रांमध्ये रस्त्यावर खड्डे खोदल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. म्हणजेच तहसिलदारांसमोरील अर्जात नमुद केलेले कारण हे चुकीचे होते असे कोणत्याही पुराव्याअभावी यामितीस म्हणता येणार नाही. अर्जास अगर दाव्यास कारण बदलले म्हणून दावा व दाव्यातील मागणी या चुकीच्या अगर बेकायदेशीर आहेत असे अनुमान काढणे योग्य ठरणार नाही. वरील विवेचनावरुन वादरस्त्यामध्ये वादींच्या वहिवाटीला प्रतिवादी हरकत अडथळा करतात ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते.

**१२.** प्रतिवादींतर्फे वकीलांनी युक्तिवादादरम्यान मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या खालीलप्रमाणे न्यायनिर्णयांवर आपली भिस्त ठेवली आहे.

1) Tanba Nusaji Mahajan Vs. Pandhari Nusaji Mahajan, 2004 0 Supreme (BOM) 706.

2) Tanba Nusaji Mahajan Vs. Pandhari Nusaji Mahajan, 2004 (4) ALL MR (325)

प्रस्तुत न्यायनिर्णयांमध्ये आवश्यकतेनुसार असलेला सुविधाधिकार आणि एखादी मिळकत अथवा रस्ता खूप दिवसापासून वापर करत आहे म्हणून मिळालेला सुविधाधिकार हे वेगवेगळे आहेत. तसेच सुविधाधिकाराचा हक्क सिध्द करण्याचा भार जो हक्क सांगतो त्याच्यावर आहे असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने

नोंदविलेला आहे. परंतू, वादीने प्रस्तुत प्रकरणामध्ये वादरस्ता हा वादीला आवश्यकतेनुसार असलेल्या सुविधाधिकाराने मिळालेला असल्याचे कथन केलेले आहे. तसेच सुविधाधिकाराचा हक्क सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे व त्याकरीता योग्य तो पुरावा देणे ही वादीची जबाबदारी आहे. आज रोजी न्यायालयाला गुणदोषावर न्यायनिर्णय दयायचा नसुन केवळ अभिलेखावर असलेला प्रथमदर्शनी पुरावा पाहुन तात्पुरता आदेश करावायाचा आहे. त्यामुळे यामितीस वरील दोन्ही न्यायनिर्णयांची प्रतिवादीला मदत होताना दिसत नाही.

3) Radha Krishna Kandolkar and Ors. Vs. Tukaram Pundulik Homkhandi 1990 0 Supreme (Bom) 140.

4) Manikarao s/o- Narayanrao Bhoge and Ors. Vs. Maheshkumar s/o-Bansilal Vyas & Another, 2011 0 Supreme (Bom) 721

प्रस्तुत न्यायनिर्णयांमध्ये प्रथागत हक्क हा सुविधाधिकार कायदयाद्वारे ओळखला जातो. परंतू, तो केवळ वादीचा किंवा विशिष्ट प्रतिवादींचा वैयक्तिक हक्क म्हणून ते दावा करु शकत नाहीत. तसेच स्थानिक प्रथेची वस्तुस्थिती प्रथागत सुविधा हक्कासाठी सिध्द करणे आवश्यक आहे असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने नोंदविला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रथागत हक्क शाबीत करण्यासाठी योग्य तो पुरावा अभिलेखावर देणे ही वादीची जबाबदारी आहे. आज रोजी न्यायालयाला गुणदोषावर न्यायनिर्णय दयायचा नसुन केवळ अभिलेखावर असलेला प्रथमदर्शनी पुरावा पाहुन तात्पुरता आदेश करावायाचा आहे. त्यामुळे यामितीस वरील दोन्ही न्यायनिर्णयांची प्रतिवादीला मदत होताना दिसत नाही.

5) Shalini Laxman Wadnerkar Vs. Bank of Baroda employees Co-Housing Society Ltd, 2006 0 Supreme (Bom) 515.

प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये गरजेला सोयीचा नियम म्हणून मानता येणार नाही. एखादया प्रकरणात पूर्ण गरज म्हणजे काय ? हे प्रत्येक प्रकरणातील परीस्थिती

आणि वस्तूस्थितीवरुन निश्चित करता येते असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीला पर्यायी रस्ता उपलब्ध असतानाही, केवळ सोयीचा रस्ता मिळावा याकरीता वादी वादरस्त्याची मागणी करत आहे. परंतू, सदर न्यायनिर्णयातील निष्कर्षाप्रमाणे योग्य तो पुरावा प्रकरणामध्ये आल्यानंतर परीस्थिती व वस्तूस्थितीवरुन वादीला वादरस्त्याची गरज आहे कि तो सोयीकरीता रस्ता मागत आहे ही बाब स्पष्ट होणार आहे. वरील विवेचनावरुन वादीला वादातीत रस्त्याव्यतीरिक इतर पर्यायी रस्ता आहे असा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे यामितीस प्रस्तुत न्यायनिर्णयाची वादीला मदत होताना दिसत नाही.

6) Baburao Ganpati Mali Vs. Balasabhe Anna Patil, 2006 0 Supreme (Bom) 478

प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये वादीने तथ्ये दडपली असतील तर तो मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाही असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने नोंदविला आहे. परंतू, प्रस्तुत दाव्यात वादीने कोणती तथ्ये दडपली आहेत याबाबत प्रतिवादीच्या कथनांव्यतीरिक्त इतर कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. सबब, या मितीस प्रस्तुत न्यायनिर्णयाची देखील प्रतिवादीला मदत होताना दिसत नाही.

7) या व्यतीरिक् मा. उच्च न्यायालय गुजरात यांच्या Devashi Gangaji Rabadiya Vs. Jayantibhai Jerambhai Sureja 2022 3 CurCC 325,

प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये दाव्यात केलेली विधाने हा पुरावा नाही. ते सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. ती कथने प्रतिवादीने कैफियत देवुन खंडीत केली नसतील तरी ती वादीला सिध्द करावी लागतील. केवळ प्रतिवादीने कैफियत देवुन वादीच्या विधानाचे खंडन केलेले नाही म्हणून वादीला दाव्यात यश मिळणार नाही असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये

दाव्यातील कथने सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. परंतू, यामितीस गुणदोषावर न्यायनिर्णय दयायचा नसून केवळ प्रथमदर्शनी पुराव्यावर तुर्तातूर्त आदेश पारीत करावयाचा असल्याने यामितीस प्रस्तुत न्यायनिर्णयाची वादीला मदत होताना दिसत नाही.

**१३.** वरील सर्व विवेचनावरुन वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे. वादी हा वादातीत रस्त्याचा पूर्वीपासून वापर करत आलेला आहे व सदर रस्त्याव्यतीरिक्त वादीला दुसरा पर्यायी रस्ता नाही ही बाब वादीने प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे.

**१४.** वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली असल्याने निश्चितच मनाई हुकूम वादींच्या लाभात न दिल्यास वादींना त्यांच्या शेतमिळकतीची वहिवाट करणे अशक्य होणार आहे व असे झाल्यास वादींचे अपरीमित असे नुकसान होण्याची शक्यता आहे. यास्तव न्यायाचा तराजू हा वादींच्या बाजूने झुकताना दिसतो असे माझे मत झाल्याने मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीताः–</u>**

**१५.** मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्यामुळे मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा निशाणी क्र. ५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशान्वये प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील रस्त्यामध्ये वादींना जाण्या–येण्यास हरकत अडथळा करू नये व खड्डे खोदू नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो देण्यात येत आहे.

३.	खर्चाबाबत आदेश नाही.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2025.11.20 11:51:34 +0530

तासगांव	(एस.वाय.वाकचौरे)
दिनांकः १८/११/२०२५.	सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, तासगांव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Abhay Arvind Randive. |
| Court | : | Shri. S.Y. Wakchaure,<br>Joint Civil Judge (J.D) & J.M.F.C.Tasgaon. |
| Date of order | : | 18.11.2025 |
| Order signed by the presiding officer on | : | 20.11.2025 |
| Order uploaded on | : | 20.11.2025 |